वर्ष ९ वे

अंक ४ था

आनंदाची उधळण करीत सण दिवाळी येई
नको फटाके, नको प्रदूषण,
लक्ष लक्ष दीपज्योतींनी मन आनंदी होई !




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१ कोटी २० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १२० विद्यार्थ्यांची सोय.

**जुलै-ऑगस्ट-सप्टे.-ऑक्टो.२००९**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु.५ लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु.६१,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु.५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# संपादकीय

प्रिय सभासद,

दिनांक १० ऑगस्ट २००८ रोजी भूमीपूजन झालेल्या पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वसतिगृहाचे बांधकाम अत्यंत वेगाने होवून एका वर्षाच्या कालावधीत आकर्षक स्वरूपातील इमारत आपणा सर्वांच्या सहकार्याने उभी राहिली आहे. पारनेरकर मंडळींच्या सामाजिक जाणिवेमुळे, सहकार्यामुळे व जिद्दीमुळेच अल्पावधीत ही देखणी इमारत उभी राहिली असून इमारतीकडे पाहिले की मोठं समाधान मिळतं – एक स्वप्न पूर्ण झाल्याचं !

सर्वांच्या मदतीचे हात असल्यास काय होवू शकतं याचं हे मूर्तीमंत उदाहरण आहे. आपणा सर्वांमुळेच हे शक्य झालं आहे. नियोजनाप्रमाणे पहिल्या टप्प्यात सुमारे ७४०० चौ.फुटांचे ३ मजल्यांचे वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण होत असून रंगरंगोटी व इतर किरकोळ अंतिम टप्प्यातील कामे चालू आहेत. वसतिगृहाच्या खोल्यांमध्ये फर्निचरचे काम करून लवकरात लवकर विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था सुरु करण्याचा मंडळाचा मानस आहे. वसतिगृहातील खोल्यातील फर्निचरसाठी अंदाजे रुपये ५ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च धरून पहिल्या टप्प्यातील बांधकामासाठी एकूण रुपये ५० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. मंडळाकडे आजवर रुपये ४० लक्ष एवढा निधी जमा असून आणखी रुपये १० लक्ष एवढ्या निधीची आवश्यकता आहे. सदरचा निधी उभा करण्यासाठी कार्यकारिणीचे प्रयत्न चालू आहेत. आपण स्वतः यासाठी मदत करावी तसेच आपल्या मित्रांना, नातेवाईकांना व हितचिंतकांना या जगन्नाथरुपी रथास हातभार लावण्यासाठी उद्युक्त करणेसाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत, ही पुनश्च अपेक्षा.

विद्यार्थ्यांनी १०वी व १२वी नंतर काय करावे या संबंधीचे तसेच विविध स्पर्धा परीक्षांसंबंधीचे व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसंबंधीचे मार्गदर्शन करण्याचा उपक्रम मंडळातर्फे गेल्या दोन वर्षापासून तालुक्यातील प्रमुख गावांमध्ये राबविलेला आहे. हा उपक्रम यापुढेही अधिक जोमाने राबविण्यास तसेच मंडळाने हाती घेतलेले विद्यार्थ्यांसाठीचे व इतर विविध उपक्रम राबविण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे.

**ज्या सभासदांची देणगी रू.५०००/- पेक्षा जास्त होईल अशा देणगीदारांचा नामफलक वसतिगृहाच्या भिंतीवर लावला जाईल. आतापर्यंत ज्या सभासदांनी रू.५०००/- पेक्षा जास्त देणगी दिली आहे त्यांची यादी सोबत प्रसिद्ध करीत आहोत. आपणा सर्वांची नावे या देणगीदारांच्या नामफलकावर यावीत हीच अपेक्षा !**

दिवाळीचे लवकरच आगमन होत आहे. ही दीपावली आपणा सर्वांस, आपल्या कुटुंबियांस व मित्र परिवारास आनंदाची, भरभराटीची व सुखसमृद्धीची जावो हीच सदिच्छा !

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

# शुभ दीपावली !

## दीपावलीच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

***दीपावलीचा आनंद असाच मनामनांत, आसमंतात सदैव भरून राहो.***
***आपणास, आपले कुटुंबियास, मित्र मंडळीस दीपावली सुखसमृद्धीची जावो !***

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## दि.३०.०९.२००९ अखेर रु.५०००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांची यादी

| नाव | मूळ गाव | देणगी रु. | नाव | मूळ गाव | देणगी रु. |
|---|---|---|---|---|---|
| पिंगळे गजानन दत्तात्रय | अळकुटी | ९००० | भोंडवे रंगनाथ शंकरराव | ढवळपुरी | ५००१ |
| क्षीरसागर रमेश पुरुषोत्तम | अळकुटी | ८००० | शिंदे रामचंद्र आनंदराव | डिकसळ | ७८१११ |
| लुंकड मोहनलाल पनालाल | अळकुटी | ६००० | शिंदे जानकू मारुती | डिकसळ | ६००० |
| बोरा रतिलाल चंदनमल | अळकुटी | ६००० | पवार मधुकर महादेव | गांगर्डे भोयरे | १०००० |
| डॉ.सोनवणे पोपट आनंदा | अपधूप | ९००० | भोगाडे यशवंत विठ्ठल | गांगर्डे भोयरे | ५००० |
| गवळी गोकुळ दगडू | अपधूप | ६००० | ॲड. विप्रदास यशंवत पंढरीनाथ | गांजीभोयरे | १६००० |
| गवळी बन्सी भागुजी | अपधूप | ५००० | खणसे निवृत्ती आप्पाजी | गांजीभोयरे | ७००१ |
| मातेरे विष्णू उर्फ बाळासाहेब महादेव | बाभुळवाडे | ७५००० | देंडगे जगदीश तुकाराम | गांजीभोयरे | ७००० |
| कोरडे विश्वनाथ यादवराव | बाभुळवाडे | ५४५०० | झावरे शिवाजीराव भिकाजी | गारगुंडी | ६३००० |
| मातेरे गुलाबराव महादेव | बाभुळवाडे | २१००१ | ॲड.लोळगे शिरीष भिकाजी | गारगुंडी | १५००० |
| मातेरे अनंत माहदेव | बाभुळवाडे | १०००० | झावरे शिवाजी उर्फ विश्राम देवराम | गारगुंडी | ५५०१ |
| जगदाळे संतोष गुलाबराव | बाभुळवाडे | ८००० | फापाळे संदिप विश्वनाथ | गारगुंडी | ५००० |
| पोटे हरिश्चंद्र भाऊ | बाभुळवाडे | ७००० | बांदल बाळासाहेब सुखदेव | गवळी पिंपरी | ५००० |
| विश्वास शिवाजी मधुकर | बाभुळवाडे | ७००० | वाबळे दिगंबर भगवंतराव | घाणेगाव | १६५०० |
| जगदाळे बाळासाहेब नारायणराव | बाभुळवाडे | ५११३ | खिंवसरा हरकचंद उत्तमचंद | घाणेगाव | ८००० |
| डॉ.जगदाळे सदाशिव लोभाजी | बाभुळवाडे | ५००१ | वाबळे विठ्ठल केशवराव | घाणेगाव | ५१०० |
| पोटे कुंडलीक सुखदेव | बाभुळवाडे | ५००० | वाबळे पोपटराव मारुती | घाणेगाव | ५००१ |
| जगदाळे शंकर पाराजी | बाभुळवाडे | ५००० | कटारिया अशोक चुनीलाल | गोरेगाव | १९००१ |
| पुरी सुरेश बारकु | बाबुर्डी | १२००० | पानमंद आप्पासाहेब भिकाजी | गोरेगाव | १८००० |
| गवळी गोरक्ष आनंदा | बाबुर्डी | ७००० | जगताप सखाराम मारुतराव | गोरेगाव | १३१०१ |
| दिवटे ठकसेन रखमाजी | बाबुर्डी | ६००० | नरसाळे हेमंत मार्तंड | गोरेगाव | ७००० |
| गवळी रमेश बजाबा | बाबुर्डी | ५००० | डॉ.नरसाळे अतुल शंकरराव | गोरेगाव | ६००० |
| कोकणे शिवाजी शेवंता | बांगरवाडी (चिंचोली) | ९००० | नरसाळे सुनील विष्णूपंत | गोरेगाव | ५००० |
| कोकणे प्रकाश गेणूß | ांगरवाडी (चिंचोली) | ६५०० | तांबे एकनाथ रावबा | गोरेगाव | ५००० |
| रोहोकले सुनील गंगाधर | भाळवणी | ६६००० | नरसाळे अरुण मार्तंड | गोरेगाव | ५००० |
| भुजबळ रामचंद्र ठकाजी | भांडगाव | १२००० | ढवळे विजय सिताराम | गुणोरे | १५००० |
| शेळके भास्करराव भिकाजी | भोंद्रे | ३८००२ | भुजबळ पोपट गंगाराम | गुंजाळ दैठणे५ | ००० |
| डॉ.झावरे सुभाष धोंडीबा | भोंद्रे | ५००१ | येवले मारुती रेवजी | गुंजाळ दैठणे५ | ००० |
| झावरे बाळकृष्ण नारायण | भोंद्रे | ५००० | डॉ.शेटीया रसिक मोतीलाल | हंगे३ | १००० |
| झंजाड सुनील सहदेव | चिंचोली | १०००० | सुर्यवंशी अनिल दादा | हंगे७ | ००० |
| चुत्तर सुभाष झुंबरलाल | चिंचोली | ६००० | बागडे संजय गेणू | हंगे१ | ०५००० |
| शेळके बबनराव दगडू | चोंभूत | २६००० | साठे बाबासाहेब भाऊसाहेब | हंगे५ | ००० |
| घोलप तुकाराम नामदेव | चोंभूत | ५००० | आंबेडकर गेणु एकनाथ | हत्तलखिंडी | ६००० |
| भोसले रामदास हनुमंत | दरोडी | २०५०१ | चौधरी मुरलीधर पंढरीनाथ | हिवरेकोरडा | ५००० |
| सौ.पावडे शारदाबाई रंगनाथ | दरोडी | १७००० | हरेल दिलीप फकिरा | हिवरेकोरडा | ५००० |
| श्रीमंदीलकर शिवाजी ज्ञानदेव | देवी भोयरे | ५००० | जाधव विठ्ठल भिकाजी | जाधववाडी | १२१११ |

| नाव | मूळ गाव | देणगी रु. | नाव | मूळ गाव | देणगी रु. |
|---|---|---|---|---|---|
| जाधव मारुती भिकाजी | जाधववाडी | ६००० | चंगेडिया राजेंद्र सुरजमल | कासारे | ६००० |
| सोबले मिलिंद प्रमोद | जामगाव | १०००० | भोंग वामन शंकर गुरुजी | कासारे | ५००० |
| सोबले मुकुंद प्रमोद | जामगाव | ५००० | नरड भाऊसाहेब गंगाराम | कासारे | ५००० |
| नाईक सुनील वामनराव | जामगाव | ५००० | श्रीमती कर्नावट कमलाबाई भागचंद | खडकवाडी | ६२००० |
| पोटघन अविनाश मारुती | जातेगाव | ६००० | कर्नावट पोपटलाल रामचंद | खडकवाडी | ५००० |
| फटांगडे एकनाथ दामोदर | जातेगाव | ६००० | खोडदे नानासाहेब पाटीलबुवा | किन्ही | ११५५०१ |
| जऱ्हाड संपत पांडुरंग | जातेगाव | ५००१ | आरेकर भाऊसाहेब / विलास भागाजी | किन्ही | १०५०१ |
| पोटघन सोन्याबापू अनाजी | जातेगाव | ५००० | खोडदे भास्कर पाटीलबुवा | किन्ही | ७००१ |
| ढोरमले गोवींद दामोदर | जातेगाव | ५००० | मुळे चंद्रकांत शामराव | किन्ही | ७००० |
| सालके रंगनाथ विठ्ठल | जवळे | ३६००० | मुळे प्रशांत प्रभाकर | किन्ही | ५००० |
| घावटे राजेंद्र कचरदास | जवळे | ७००१ | देंडगे रावसाहेब धोंडीबा | कोहकडी | ५००० |
| सालके अशोक तुकाराम | जवळे | ५००० | कोल्हे अरुण चांगदेव | लोणी हवेली | २५००० |
| सोमवंशी प्रकाश बबनराव | जवळे | ५००० | पडवळ नामदेव गंगाधर | लोणी मावळा | ९६०० |
| बडवे अशोक दत्तात्रय | जवळे | ५००० | पडवळ नितीन तुकाराम | लोणी मावळा | ५१५२ |
| लोढा सचीन प्रेमसुख | काळकूप माळकूप | ५१०१ | बागुल दिलीप वामन | मांडवे खुर्द | ७२५० |
| इंजि.ठुबे विजयकुमार गोविंदराव | कान्हूर पठार | १५५००० | ॲड.जाधव अजितकुमार दिनकरराव | मांडवे खुर्द | ६००० |
| बोकरीया सुनील शांतीलाल | कान्हूर पठार | ६१००० | वैद्य संजय दिगंबर | मांडवे खुर्द | ५००० |
| ॲड.सोबले पोपटराव भिकाजी | कान्हूर पठार | ११००३ | तरटे राजेश गुलाबराव | म्हस्ने५ | ००० |
| ठुबे दत्तात्रय तुकाराम | कान्हूर पठार | ११००० | बोऱ्हुडे सुरेश बबनराव | नारायणगव्हाण | ५००१ |
| गायखे धोंडीबा गणपत | कान्हुर पठार | ८००० | डॉ.गायकवाड पांडुरंग तुकाराम | नांदूर पठार | ६००० |
| वाघुंडे सुनील निवृत्ती | कान्हूर पठार | ८००० | लंके संजय विनायक | निघोज | १३००० |
| डॉ.मुथीयान सुशील लालचंद | कान्हूर पठार | ७००० | सोनवणे बाळासाहेब गंगाराम | निघोज | ८००० |
| ठुबे दत्तात्रय आप्पाजी | कान्हूर पठार | ७००० | ॲड. खराडे बाळासाहेब रामचंद्र | निघोज | ७००० |
| ठुबे प्रकाश सदाशिव | कान्हूर पठार | ७००० | खराडे प्रदीप सुधाकर | निघोज | ६००० |
| ठुबे दिपक भालचंद्र | कान्हूर पठार | ७००० | लामखडे शिवाजीराव दगडू | निघोज | ६००० |
| डॉ.भळगट जवाहर चंदनमल | कान्हूर पठार | ६००१ | डॉ.खराडे सुधाकर रामचंद्र | निघोज | ५१११ |
| ठुबे शंकर तुकाराम | कान्हूर पठार | ६००० | खराडे सुरेश रामचंद्र | निघोज | ५१०० |
| ठुबे प्रकाश कृष्णराव | कान्हूर पठार | ६००० | डॉ.ढवळे संतोष पांडूरंग | निघोज | ५००० |
| झरेकर उत्तम किसन | कान्हूर पठार | ६००० | थोरात शिवाजी सखाराम | पाडळी आळे | ७००० |
| शिंगवी गिरीधरलाल जेठमलजी | कान्हुर पठार | ५००० | थोरात पोपट केशव | पाडळी आळे | ५०११ |
| खिंवसरा अमोलकचंद झुंबरलाल | कान्हुर पठार | ५००० | शिरोळे मधुकर हौशाभाऊ | पाडळी दर्या१ | ११०० |
| थोरात सदाशिव गणपत | करंदी | २५००० | खोसे संजय यशवंत | पाडळी दर्या१ | ०५०३ |
| बोरुडे मधुकर रंगनाथ | करंदी | ५००० | खोसे भास्कर खंडू | पाडळी दर्या७ | ००० |
| डॉ.वाफारे बाळासाहेब नाथूजी | कर्जुले हरेश्वर | १२००० | देशमुख पोपटराव सोनाजी | पळवे६ | ००० |
| जाधव पोपट आनंदराव | कर्जुले हरेश्वर | ८००० | गाडीलकर गोरक्ष महादेव | पळवे६ | ००० |
| उंडे प्रशांत लक्ष्मणराव | कर्जुले हरेश्वर | ६५०० | गाडीलकर अविनाश हरिभाऊ | पळवे५ | ००० |
| भळगट प्रशांत रसिकलाल | कर्जुले हरेश्वर | ६१०३ | छाजेड विजयकुमार रतनचंद | पळशी | ७००० |
| शिर्के रामदास सोनाजी | कर्जुले हरेश्वर | ६००० | भालेराव सतीश मधुकर | पानोली | ८००० |
| नरवडे अनिल पांडुरंग | कर्जुले हरेश्वर | ५००० | डॉ.शिंदे प्रकाश पोपटराव | पानोली | ८००० |
| कुलकर्णी अरूण वामन | कासारे | २०००० | भालेराव राजेश मधुकर | पानोली | ७५०० |
| कुलकर्णी हेमंत वामन | कासारे | ६००० | भालेराव मिलींद मनोहर | पानोली | ७००० |

| नाव | मूळ गाव | देणगी रु. | नाव | मूळ गाव | देणगी रु. |
|---|---|---|---|---|---|
| भालेराव संजय मधुकर | पानोली | ५००० | डॉ.काळे जयदीप कृष्णराव | पिंपरी जलसेन | ९००१ |
| थोरात लक्ष्मण उर्फ विलास साहेबराव | पानोली | ५००० | शेटीया विजयकुमार हिरालाल | पिंपरी जलसेन | ७१०२ |
| घोडके हौसाराम विठ्ठलराव | पारनेर | १२५००० | दहिवळ अशोक अंबादास | पिंपरी जलसेन | ६७११ |
| आ.औटी विजयराव भास्करराव | पारनेर | १००००० | थोरात अशोक तबाजी | पिंपरी जलसेन | ६०५१ |
| गांधी गिरीश दगडूलाल | पारनेर | ५१००० | थोरात लक्ष्मण हरिभाऊ | पिंपरी जलसेन | ५१०१ |
| गांधी सुभाष दगडूलाल | पारनेर | १५००० | वाढवणे प्रदीप आप्पासाहेब | पिंपरी जलसेन | ५००२ |
| शिंगवी मुळचंद हसराज | पारनेर | १४१०० | काळे विकास गणपत | पिंपरी जलसेन | ५००० |
| गांधी सरदार दगडूलाल | पारनेर | ११००० | शिंदे बाळासाहेब गोविंद | पिंपरी पठार | ८५०२ |
| गांधी जयप्रकाश दगडूलाल | पारनेर | ११००० | शिंदे संदीप सिताराम | पिंपरी पठार | ७५०० |
| सौ.कासवा साधना रविंद्र | पारनेर (पुणे) | ११००० | पागीरे राजाराम नानाभाऊ | पिंपरी पठार | ५५०० |
| पुजारी भानुदास गवराम | पारनेर | १०००० | बोरुडे दशरथ भाऊ | पुणेवाडी | १०५५५ |
| हांडे भास्कर रामभाऊ | पारनेर | ९५०० | दुस्मान मुरलीधर कोंडाजी | पुणेवाडी | ५००२ |
| नगरे अशोक चांगदेव | पारनेर | ९००० | ॲड.रेपाळे सहादू भाऊराव | पुणेवाडी | ५००१ |
| घोडके भास्कर विठ्ठलराव | पारनेर | ८००० | पठारे भगवान सावळेराम | राळेगण सिद्धी | ५०००० |
| चव्हाण वसंतराव महादेव | पारनेर | ७१०२ | मापारी निळकंठ सहादू | राळेगण सिध्दी | ११९०० |
| बापट विजय विष्णूु | ारनेर | ७००० | मापारी बाळकृष्ण गुलाबराव | राळेगण सिद्धी | ६१०३ |
| गांधी सचीन राजकुमार | पारनेर | ७००० | डॉ.आवारी सुनील रावसाहेब | रांधे८ | ५०० |
| गांधी धनराज रामचंद | पारनेर | ७००० | आवारी नंदकिशोर नामदेव | रांधे७ | ००० |
| अंबुले गणपत गोविंद | पारनेर | ६५०० | आवारी नानासाहेब सखाराम | रांधे५ | ५५५ |
| गांधी वसंतलाल अमरचंद | पारनेर | ६००२ | आवारी संदिप शंकरराव | रांधे५ | ००० |
| प्रा.वाघमारे मुकुंद दत्तात्रय | पारनेर | ६००१ | डॉ.कुलकर्णी रमेश भालचंद्र | रांजणगाव | २०५०० |
| शिंगवी विजय पोपटलाल | पारनेर | ६००१ | जवक मुरलीधर मारुती | रांजणगाव | ७००० |
| ॲड. गांधी शांतीलाल रामचंद | पारनेर | ६००० | यादव चंद्रकांत साहेबराव | रांजणगाव | ५००० |
| पोळ अतुल देवीदास | पारनेर | ६००० | श्रीमती संचेती विमलाबाई धनराज | रुई छत्रपती | ७००० |
| औटी पवन विद्याधर | पारनेर | ६००० | साबळे भाऊसाहेब रामभाऊ | रुई छत्रपती | ५००० |
| डॉ.औटी उल्हास पांडुरंग | पारनेर | ६००० | पाटील रामराव नारायण | सांगवी सूर्या८ | ००३ |
| घोडके दिनकर विठ्ठलराव | पारनेर | ६००० | आढाव दौलतराव पुनाजी | सांगवी सुर्या८ | ००१ |
| चेडे राजेंद्र सुखदेव | पारनेर | ६००० | मुळे हरिभाऊ संपतराव | शेरी कासारी | ६१०१ |
| ठुबे शिवाजी लक्ष्मण | पारनेर | ६००० | चत्तर शिवाजीराव बाळासाहेब | सिद्धेश्वरवाडी | ७००१ |
| शेटे दत्तात्रय खंडोजी | पारनेर | ५५०० | श्रीमती कावरे शैला रविंद्र | सिद्धेश्वरवाडी | ५००१ |
| शेटे सुनील भगवान | पारनेर | ५१११ | चत्तर तुकाराम साहेबराव | सिद्धेश्वरवाडी | ५००० |
| ॲड.औटी सुधाकर कृष्णराव | पारनेर | ५००० | श्रीमती कावरे सुशिला शांताराम | सिद्धेश्वरवाडी | ५००० |
| बोरा राजेंद्र चांदमल | पारनेर | ५००० | म्हस्के गिताराम भागाजी | सोबलेवाडी | ११००० |
| गांधी राजकुमार दगडूलाल | पारनेर | ५००० | झंजाड भास्करराव आनंदराव | सुपे७ | ८०० |
| राजे मलीक रहीम | पारनेर | ५००० | मैड गोरखनाथ बाबुराव | सुपे७ | ००० |
| देशमुख प्रकाश रामचंद्र | पारनेर | ५००० | डॉ.बांडे बाळासाहेब दगडू | टाकळी ढोकेश्वर | ६५७५० |
| ठुबे तुकाराम बाळाजी | पारनेर | ५००० | बांडे शिवाजी राघूजी | टाकळी ढोकेश्वर | ६५००० |
| जगताप मालोजी बाबाजी | पिंपळगाव रोठा | ८००० | साई जनसेटस् (किसन गागरे,संजय झावरे) | टाकळी ढोकेश्वर | २७५५१ |
| मकाशिर भारत दामोदर | पिंपळनेर | ७००० | खिलारी विजय जगन्नाथ | टाकळी ढोकेश्वर | २६००० |
| डॉ.रासकर समीर तुकाराम | पिंपळनेर | ६००० | थोपटे महादू मळीभाऊ | टाकळी ढोकेश्वर | १५००० |
| कदम संजय बाबुराव | पिंपरी जलसेन | ६५५०० | देशमुख सुरेश यादवराव | टाकळी ढोकेश्वर | १५००० |


| नाव | मूळ गाव | देणगी रु. |
|---|---|---|
| बांठीया बन्सीलाल पन्नालाल | टाकळी ढोकेश्वर | ६००१ |
| ॲड. कटारिया अमृतलाल चुनीलाल | टाकळी ढोकेश्वर | ६००० |
| धुमाळ शिवाजी विठ्ठलराव | टाकळी ढोकेश्वर | ५००० |
| सन्मित्र ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था | टाकळी ढोकेश्वर | ५००० |
| कटारिया नितीन गिरीधारीलाल | तिखोल | ५००१ |
| प्रा.तांबडे पोपट सावळेराम | तिखोल | ५००० |
| कोठारी चंद्रकांत तेजमल | वडगाव दर्या६ | १११ |
| डॉ.केदारे संपत बाबुराव | वडनेर हवेली | ९००० |
| डॉ.पठारे संभाजी आण्णासाहेब | वडुले६ | ५०१ |
| गागरे सखाराम कोंडीबा | वनकुटे | १२००० |
| ताठे शिवाजी हरिभाऊ | वेसदरे | १२००० |
| जाधव दिलीप किसन | वेसदरे | ९००० |
| रोहकले शिवाजी काशिनाथ | विरोली | ६००० |
| पवार बापूसाहेब रंगनाथ | वडगाव आमली | २५००० |
| डेरे उत्तम बबनराव | वडगाव आमली | ६००० |
| दिघे प्रवीण बबनराव | वडझिरे | १२००० |
| मोरे साहेबराव गंगाधर | वडझिरे | ११००० |
| एरंडे शंकरराव हरिभाऊ | वडझिरे | १०००० |
| एरंडे रामचंद्र नारायण | वडझिरे | ८००२ |
| प्रा.एरंडे ज्ञानदेव हरिभाऊ | वडझिरे | ७५०० |
| मोरे गवराम महादू | वडझिरे | ७००० |
| चौधरी गंगाधर रामभाऊ | वडझिरे | ६००० |
| लंके सोपानराव गहिनाजी | वडझिरे | ६००० |
| निघुट शांताराम तुकाराम | वडझिरे | ५१५१ |
| बोरकर शिवाजी मेथाजी | वडझिरे | ५००१ |
| दिघे विष्णू मारुती | वडझिरे | ५००० |
| चौधरी पोपट बाळाजी | वडझिरे | ५००० |
| मगर राजेंद्र बबनराव | वाघुंडे | १२००० |
| शिंदे शिवाजीराव बापूराव | वाळवणे५ | ५०१ |
| प्रा.पठारे दत्तात्रय दौलतराव | वाळवणे५ | ००० |
| चेमटे भास्कर बाबुराव | वासुंदे | ५००१ |
| प्रा.गायके माधव पंढरीनाथ | वासुंदे | ५००० |
| साळुंके उत्तम लक्ष्मण | वासुंदे | ५००० |
| यादव राजेश महादेव | यादववाडी | ९१०० |
| साठे मुरलीधर तुकाराम | यवती पाडळी | १७००० |
| खेसे विठ्ठल दादाराम | यवती पाडळी | ६००१ |
| करंजुले बाळासाहेब मोहन | यवती पाडळी | ५१०० |
| करंजुले शरद नारायण | यवती पाडळी | ५००० |
| बनकर शशिकांत जगन्नाथ | श्रीरामपुर | ५००० |
| पंदरकर वसंत दत्तात्रय | पिंपळगाव पिसा (श्रीगोंदा) | ७००० |
| पवार रावसाहेब दगडू | वडगाव गुप्त ता.नगर | ५००० |

| नाव | मूळ गाव | देणगी रु. |
|---|---|---|
| ढोकरे प्रदीप धोंडीबा | कोठे ता.संगमनेर | ७१००१ |
| कटारिया एच.सी. | पुणे२ | ०००० |
| मन प्रॉजेक्टस् लिमिटेड | पुणे१ | ५००० |
| साठे एस. एस. | पुणे१ | ५००० |
| श्री साईबाबा नागरी पतसंस्था | पुणे (सांगवी) | १४००० |
| खंदारे नंदकुमार जीवनराव | पुणे१ | ३००० |
| आमदार लांडे विलास विठोबा | पुणे (भोसरी) | ११००० |
| मे.गर्गे कन्स्ट्रक्शन | पुणे१ | ०००० |
| शहा बी.आर. | पुणे१ | ०००० |
| सुजन टेकनोमेट लि. | पुणे१ | ०००० |
| बहिरट ब्रदर्स | पुणे (पिंपरी) | १०००० |
| खुळे पी. व्ही. | पुणे (पिंपरी) | १०००० |
| गव्हाणे अजितशेठ | पुणे (भोसरी) | ७००० |
| पिंपळे अविनाश रघुनाथ | पुणे६ | १०० |
| भरत इंडस्ट्रिज (देशमुख प्रदीप) | पुणे५ | ५०० |
| सोनवणे अशोक दशरथ | पुणे५ | ००१ |
| जनरल इंडस्ट्रियल कंट्रोल | पुणे५ | ००१ |
| सूर्यवंशी रविंद्र दयाराम | पुणे (पिंपरी) | ५००१ |
| माजी आमदार कुमार गोसावी | पुणे५ | ००० |
| भोईटे दिलीप सहादू | पुणे५ | ००० |
| मे.आर. एस. स्क्रॅप सेंटर | पुणे५ | ००० |
| मे.अनुज मेटल्स | पुणे५ | ००० |
| राधाकृष्णन टी.व्ही. | पुणे५ | ००० |
| काळे लहू बबन | पुणे५ | ००० |
| सेवणे श्रीकांत | पुणे५ | ००० |
| जाधवराव राजेश दत्ता | पुणे५ | ००० |
| अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर | पुणे५ | ००० |
| बसुदे रामचंद्र अंबाजी | पुणे५ | ००० |
| शेख फारुक बी | पुणे५ | ००० |
| सय्यद इस्तेवार युसुफ | पुणे५ | ००० |
| सांडभोर कन्स्ट्रक्शन | पुणे५ | ००० |
| नवले सतीश नवलसिंह | पुणे५ | ००० |
| खामकर अनिल लक्ष्मण | पुणे (पिंपरी) | ५००० |
| दि क्रिएशन | पुणे५ | ००० |
| भालेराव जयसिंग रामचंद्र | तळेगाव दाभाडे | ५००० |

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**

*-: कर्तृत्व पारनेरकरांचे :-*

# भास्करराव भिकाजी शेळके - एक आदर्श व्यक्तीमत्व



माणसाचं जीवन एखाद्या नदीप्रमाणे असते. नदी उगमापासून छोटेसे रूप घेऊन पुढे अनेक प्रवाहांना सामावून घेत घेत मोठे रूप धारण करते. कधी डोंगराच्या कडेकपारीतून अनेक अडथळ्यांना पार पाडीत, कधी रौद्र रूप धारण करीत तर कधी संथपणे वाहत ती अथांग समुद्रात विलीन होते.

भास्कररावांचा जीवन प्रवाससुद्धा अत्यंत वेडीवाकडी वळणे घेत सर्व अडथळे पार पाडीत प्रगतीच्या दिशेने झेपावतच राहिला. त्यांचे भोंद्रे गाव आडवळणाचे. वडील भिकाजीराव निष्ठावान शिक्षक. गुरूजींनी १५ वर्षे वासुंदे येथे शिक्षकाची नोकरी केली. भास्कररावांचा जन्म व इयत्ता चौथीपर्यंत प्राथमिक शिक्षण वासुंद्यांमध्येच झाले. वडील अत्यंत शिस्तप्रिय. त्यामुळे शिक्षकाचा मुलगा म्हणून कोणतीच सूट नव्हती तर आपल्या वडीलांना आपल्यामुळे कोणी नाव ठेवू नये म्हणून ते कायम दक्ष असत. त्यावेळच्या प्राथमिक शिक्षकांनी त्यांचा शिक्षणाचा पाया पक्का केला. ते चौथी पास झाल्यानंतर गुरूजींची बदली कान्हूर पठार येथे झाल्यामुळे मूळ गावी भोंद्रे येथे राहू लागले व कान्हूर पठार येथे जाऊन येऊन शिक्षण घेऊ लागले. इयत्ता सातवीमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या मुलांमध्ये ते **जिल्ह्यात पहिले** आले. तेव्हा त्यांचा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक, अहमदनगरने खास सत्कार केला. त्यांचे माध्यमिक शिक्षण रयत शिक्षण संस्था, कान्हूर पठार येथेच पूर्ण झाले. अकरावीमध्ये ते कान्हूर पठार या शाळेमध्ये सर्व **विद्यार्थ्यांमध्ये पहिले** आले. त्यावेळेच्या **निरलस व त्यागी शिक्षकांच्या** मार्गदर्शनामुळे तसेच आई-वडीलांच्या प्रेरणेमुळे ते आयुष्यात उत्तरोत्तर प्रगतीच करीत राहीले.

इंजिनियर होण्याच्या उद्देशाने त्यांनी अहमदनगर कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. पण अगदी थोड्याच मार्कांनी त्यांची संधी हुकली. तरी निराश न होता ते बी.एस.सी. भौतिकशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झाले. पुढे डोंबिवली येथे त्यांचे थोरले बंधू वसंतराव जे सेंच्युरी एन्का या कंपनीत मोठ्या पदावर अधिकारी होते त्यांचेकडे ते राहू लागले. त्यांच्या बंधूनासुद्धा सामाजिक कामाची अतिशय आवड होती. महानगर बँक स्थापन करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. येथेच त्यांच्या महत्वाकांक्षेला पंख फुटू लागले. तेथे त्यांनी बी.एड्. करून माध्यमिक विद्यालयात एक वर्ष शिक्षक म्हणून काम केले.

यामुळे समाधानी असले तर ते भास्करराव कसले. आयुष्याची पुढील झेप घेण्याकरीता त्यांच्यातील पुरूषार्थ जागा झाला. स्वस्थ न बसता त्यांनी कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय स्वतःच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेची तयारी केली व त्यात उत्तीर्ण झाले. त्यांना मंत्रालय सचिवालयामध्ये समाजकल्याण, सांस्कृतिक, क्रिडा आणि पर्यटन विभागामध्ये सहाय्यक म्हणून नोकरी मिळाली. तेथे असतानासुद्धा त्यांनी शिक्षण चालूच ठेवले. सिद्धार्थ लॉ कॉलेजमधून त्यांनी कायदे शास्त्राची पदवी संपादन केली व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वर्ग-१ अधिकाऱ्यांच्या एकत्रित स्पर्धा परिक्षेची तयारी कोणाचेही मार्गदर्शन न घेता केली. या स्पर्धा परिक्षेमध्ये त्यांचा **महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक** आला.

येथून पुढे त्यांच्या आयुष्याची सुरूवात वेगळ्या वळणावर सुरू झाली. **उपनिबंधक, सहकारी संस्था,** महाराष्ट्र राज्य या पदावर त्यांची डिसेंबर १९७७ मध्ये नेमणूक होऊन ते सहकार खात्यामध्ये रुजू झाले. त्यानंतर **सोलापूर येथे प्रादेशिक सहसंचालक, हातमाग, यंत्रमाग, सहकारी वस्त्रनिर्माण, प्रादेशिक उपसंचालक, साखर** अशा विविध पदांवर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर काम केले. प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला.

१९८६ मध्ये त्यांची **सहनिबंधक** म्हणून पदोन्नती झाली. **सहसंचालक पणन, गृहनिर्माण व नागरी बँका** या विविध पदावर त्यांनी सहकार आयुक्तालय व पणन संचालनालय येथे काम केले. धुळे येथे **'महाफेड'** हा तेलाचा प्रकल्प उभारणीसाठी विशेष प्रयत्न केले. नागर पतसंस्था व गृहनिर्माण संस्थांचे आदर्श पोटनियम तयार करण्यासाठी अथक परिश्रम करून त्यांना अंतिम स्वरूप दिले. **विभागीय निबंधक सहकारी संस्था** पुणे या पदावर १९९० ते १९९३ व १९९५ ते १९९६ या कालावधीत दोनदा काम करण्याची संधी त्यांना मिळाली. या कालावधीत त्यांनी सहकारी संस्थांच्या वाढीसाठी तसेच बंद संस्था अवसायनात काढून काही संस्था पुर्नजिवीत केल्या. दलित, गरीब, सामान्य लोकांसाठी व महिलांसाठी संस्था स्थापन केल्या. त्यामुळे बेरोजगारांना रोजगार मिळाला.

शिखर/राज्य पातळीवरील मोठ्या सहकारी संस्थांवर व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कार्यशैलीची चुणूक दाखविली. १९९८ मध्ये त्यांची **अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था** म्हणून पदोन्नती झाली. त्यांनी म.रा.सहकारी संघ या संस्थेवर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना शैक्षणिक व प्रशासकीय असे विविध उपक्रम हाती घेतले. सहकार खात्यातील अनेक विभागांमध्ये त्यांनी काम केले व एक उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म्हणून नाव कमावले.

**अतिरिक्त निबंधक सहकारी संस्था व साखर संचालक,** म.रा.,पुणे येथे काम करताना त्यांनी बंद पडलेले साखर कारखाने चालू होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. आपला **पारनेर तालुका सहकारी साखर कारखाना** भाडे तत्वावर देण्यासाठी पुढाकार घेऊन चालवावयास दिला. त्यामुळे आज कारखाना उत्तमरित्या चालू असून अनेकांना रोजगार मिळाला व शेतकऱ्यांचा सुद्धा फायदा झाला.

यानंतर म.रा.कृषी ग्रामीण विभाग सहकारी बँक, मुंबई या संस्थेचे प्रमुख म्हणून काम पाहतांना अनेक वर्षे थकबाकीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून

**एकरकमी कर्ज फेड योजना** राबवून शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी मदत केली. डिसेंबर २००७ ते सेवानिवृत्त (दि.३०.०६.२००९) होईपर्यंत त्यांनी **अप्पर आयुक्त व विशेष निबंधक** म्हणून काम पाहिले. याच कालावधीत राज्य व केंद्र शासनाची शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी व कर्ज सवलत योजना जाहीर झाली. या योजनेचा बारकाईने अभ्यास करून त्याचा लाखो शेतकऱ्यांना त्यांनी लाभ मिळवून दिला.

३७ वर्षांच्या शासकीय नोकरीत त्यांनी एक निस्पृह व कर्तबगार अधिकारी म्हणून नावलौकिक मिळविला. त्यांच्याकडे कोणीही काम घेऊन गेले व योग्य असेल तर चाकोरीबाहेर जाऊन देखील ते काम करीत असत.

साहेबांचा मूळ पिंड सामाजिक कार्यकर्त्याचा असल्यामुळे त्यांनी नोकरीत असताना देखील अनेक सामाजिक उपक्रमात भाग घेणे चालूच ठेवले होते. **अहमदनगर जिल्हा मित्र मंडळाचे** गेली १५ वर्षे ते **अध्यक्ष** असून पुणे येथे संस्थेतर्फे वसतीगृहाची जागा विकत घेऊन **विद्यार्थी वसतीगृह** सुरू केले आहे. साहेब पारनेर तालुका मित्र मंडळाचे जेष्ठ सदस्य असून त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा आम्हास नेहमीच होतो. युनिव्हर्सल पोएट्री फाऊंडेशन पुणे या संस्थेच्या माध्यमातून साहित्यीक चळवळ वृद्धींगत होण्यासाठी त्यांनी हातभार लावला आहे. तसेच त्यांच्या जेष्ठ बंधूंच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी सर्व भावंडांनी **''कै. वसंतराव भिकाजी शेळके ट्रस्ट''**ची स्थापना करून त्यामार्फत तालुक्यामध्ये खेळ व वक्तृत्व स्पर्धा घेणे तसेच गुणवंतांचा सत्कार करणे सुरु केले. **श्री.रूक्मिणी सहकारी बँक, श्रीगोंदा** व **श्री.स्वामी समर्थ सहकारी बँक, निघोज** या बँका स्थापन करून त्यामार्फत अनेकांना रोजगार व कर्ज मिळत असून त्यामुळे अनेकांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. **कांदा उत्पादन सहकारी संघ, निघोज** स्थापन करून त्याही क्षेत्रात त्यांचे काम चालू आहे. या सर्व कामात त्यांच्या सुविद्य पत्नी ॲड.सौ.यशोधराताई यांची त्यांना मोलाची साथ मिळत आहे. त्यांची जेष्ठ कन्या डॉ.सौ.पद्मजा पठारे पारनेर येथे प्रॅक्टीस करीत आहे. मुलगी कुमारी गोपी एरॉनॉटीक्स इंजिनियर व मुलगा गुरुदत्त कॉम्प्युटर इंजिनियर आहे.

साहेबांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन आरोग्यदायी जावे व त्यांना दिर्घायुष्य लाभून त्यांचा समाजास फायदा होवो, हीच सदिच्छा.

शब्दांकन - हौसाराम घोडके

## नांदा सौख्य भरे

- श्री.विलास गोविंदराव ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.शितल** व श्री.शिवाजी बरबडे, रा.उरूळी कांचन यांचे सूपुत्र **चि.नवनाथ** यांचा शुभविवाह दिनांक ०४.०२.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.तुकारामशेठ गंगाधर पडवळ, रा.लोणी मावळा यांची सुकन्या **सौ.शितल** व श्री.किसनराव बाबुराव दुधाडे, रा.लोणी हवेली यांचे सपुत्र **चि.संदीप** यांचा शुभविवाह दिनांक १८.०४.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.दशरथ विश्वनाथ कोठावळे, रा.सांगवी सूर्या यांची सुकन्या **सौ.मिथल** व कै.चंद्रकांत मारुती कामठे, रा.पुणे यांचे सुपुत्र **चि.संदीप** यांचा शुभविवाह दिनांक १९.०४.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.रेवणनाथ नारायण भनगडे, रा.भनगडेवाडी यांचे सुपुत्र **चि.शाम** व दिलीप एकनाथ शिंदे गुरूजी, रा.टाकळी खातगाव ता.नगर यांची सुकन्या **सौ.सोनल** यांचा शुभविवाह दिनांक ०१.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.भनगडे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.पोपटराव नानाभाऊ पायमोडे रा.टाकळी ढोकेश्वर यांची सुकन्या **सौ.प्रमिला** व श्री.धोंडीभाऊ बाबूराव चेमटे रा.वासुंदे यांचे सुपुत्र **चि.संतोष** यांचा शुभविवाह दि.०६.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहा निमित्त श्री.पायमोडे यांनी मंडळास **रू.२०००/-** व श्री.चेमटे यांनी **रू.१००१/-** देणगी दिली.
- श्री.बाळकृष्ण भिमाजी नवले, रा.नवलेवाडी यांचे सुपुत्र **चि.प्रणव** व श्री.दत्तात्रय बाळासाहेब लोकरे (कदम), रा.सांगली यांची सुकन्या **सौ.सोनल** यांचा शुभविवाह दिनांक ०७.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त श्री.नवले यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.ओंकारेश्वर सिताराम झावरे, रा.टाकळी ढोकेश्वर यांची सुकन्या **सौ.धनेश्वरी** व श्री.पोपटराव गणपतराव कोल्हे, रा. काष्टी ता.श्रीगोंदा यांचे सुपुत्र **चि.प्रशांत** यांचा शुभविवाह दिनांक १०.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.झावरे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- वासुंदे गावचे सरपंच श्री.प्रतापराव पाटील यांचे सुपुत्र **चि.युवराज** व श्री.विजयराव केशवराव देशमुख, रा.रूभोंडी, ता.अकोले यांची सुकन्या **सौ.शितल** यांचा शुभविवाह दिनांक १०.०५.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.श्रीकांत काशिनाथ भालेराव, रा.पानोली यांचे सुपुत्र **चि.अतुल** व श्री.नरेश शास्त्री, रा.अहमदनगर यांची सुकन्या **सौ.स्वाती** यांचा शुभविवाह दि. १६.०५.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.विश्वनाथ लक्ष्मण ढुमणे, रा.अळकुटी यांचे सुपुत्र **चि.अमोल** व श्री.राजेंद्र खुमाजी नाटे, रा. पुणे यांची सुकन्या **सौ.अश्विनी** यांचा शुभविवाह दिनांक १६.०५.२००९ रोजी संपन्न झाला.

# नांदा सौख्य भरे


- श्री.नामदेव बाळाजी कोकाटे, रा.कर्जुले हरेश्वर यांची सुकन्या **सौ.माधुरी** व श्री. राम भास्कर देशमाने रा.पारनेर यांचे सुपुत्र **चि.योगेश** यांचा शुभविवाह दिनांक १७.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.कोकाटे व श्री. देशमाने यांनी मंडळास प्रत्येकी **रू.१००१/-** देणगी दिली.
- श्री.परशुराम सखाराम सोंडकर, रा.हंगे यांची सुकन्या **सौ.राजश्री** व श्री.गोपीनाथ किसन भद्रे रा.चिचोंडी पाटील, ता.नगर यांचे सुपुत्र **चि.अजय** यांचा शुभविवाह दि.१७.०५.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री. सुभाष मळूजी घोरपडे, रा.चिंचोली यांची सुकन्या **सौ.पुनम** उर्फ **योगिता** व श्री.भगवानराव यशवंत रोहोकले, रा.अहमदनगर यांचे सुपुत्र **चि.संदीप** उर्फ **रितेश** यांचा शुभविवाह दिनांक १७.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.घोरपडे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.दत्तात्रय खंडोजी शेटे, रा.पारनेर यांची सुकन्या **सौ.प्रज्ञा** व श्री.बाळासाहेब शंकरराव गौर, रा. बीड यांचे सुपुत्र **चि.अमर** यांचा शुभविवाह दि. १९.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.शेटे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- आयु.बाळासाहेब गंगाराम सोनावणे, रा.निघोज यांची सुकन्या **सौ.ज्योती** व आयु.कुंडलिक योगीराज गायकवाड रा.भूम जि.उस्मानाबाद यांचे सुपुत्र **चि.सत्यजित** यांचा मंगल परिणय सोहळा दिनांक १९.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या मंगल प्रसंगानिमित्त आयु. बाळासाहेब सोनवणे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- प्रा.श्री.बबन सुखदेव जाधव, रा.वेसदरे यांची सुकन्या **डॉ.सौ.सोनाली** व श्री.अरविंद निळकंठराव काकडे रा.निंबूत ता.बारामती जि.पुणे यांचे सुपुत्र **डॉ.निलेश** यांचा शुभविवाह दि. ३०.०५.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.जाधव यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.
- श्री.आप्पासाहेब भिकाजी पानमंद, रा.गोरेगाव याची सुकन्या **डॉ.सौ.वृषाली** व श्री.सहादू काळू नाठे रा.गोदे ता.इगतपुरी जि.नाशिक यांचे सुपुत्र **डॉ.संजय** यांचा शुभविवाह दि.०१.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त श्री.पानमंद यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.
- श्री.सुधाकर रामचंद्र खराडे, रा.निघोज यांचे सुपुत्र **चि.मुकुंद** व श्री.शंकरराव धार्मीक यांची सुकन्या **सौ.चंचला** यांचा शुभविवाह दिनांक ०२.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.सुधाकर खराडे यांनी मंडळास **रू.२१११/-** देणगी दिली.
- श्री.अनंतराव खंडूजी औटी, रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.अविनाश** व श्री.मच्छिंद्र बाबुराव दाते, रा.ओतुर यांची सुकन्या **सौ.मनाली** यांचा शुभविवाह दि.०४.०६.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.राजाराम कान्हू जाधव, रा.कर्जुले हरेश्वर यांचे सुपुत्र **चि.शांताराम** व श्री.किसन बाबुराव नवसुपे, रा. हातवळण ता.नगर यांची सुकन्या **सौ.अश्विनी** यांचा शुभविवाह दिनांक ०४.०६.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.भास्कर शंकर अडसूळ, रा.हिवरे कोरडा यांची सुकन्या **सौ.दिपीका** व रामभाऊ येसू येवले, रा.गुंजाळ दैठणे यांचे सुपुत्र **चि.यशवंत** उर्फ **दादासाहेब** यांचा शुभविवाह दि.०६.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त श्री.अडसुळ यांनी मंडळास **रू.११००/-** देणगी दिली.
- श्री.अरूण शंकर देंडगे, रा.गांजीभोयरे यांचे सुपुत्र **चि.श्रीराम** व श्री.ज्ञानेश्वर बबन कोल्हे, रा.पुणे यांची सुकन्या **सौ.अश्विनी** यांचा शुभविवाह दि.०६.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त श्री.देंडगे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे, रा.पाडळी दर्या यांची सुकन्या **सौ.श्रुतीका** व श्री.बाबाजी किसनराव नेहरकर, रा.येडगाव ता.जुन्नर यांचे सुपुत्र **चि.मुकुंद** यांचा शुभविवाह दि. ०९.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.शिरोळे यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.
- मंडळाचे देणगीदार श्री.प्रकाश बाजीराव घोरपडे, रा.मंगळापूर, ता.कोरेगाव, जि.सातारा यांची सुकन्या **सौ.प्रगती** व श्री.सुभाष अधिकराव संकपाळ, रा.रामकुंड, जि.सातारा यांचे सुपुत्र **चि.रविराज** यांचा शुभविवाह दि.१२.०६.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.बाळासाहेब दगडूजी पाटील, रा.कडूस यांचे सुपुत्र **ॲड.चि.युवराज** व श्री.गणपत महादू मते, रा.कन्हेरवाडी यांची सुकन्या **सौ.जयश्री** यांचा शुभविवाह दि.१२.०६.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त दोन्ही कुटुंबियांनी सत्काराची रक्कम वाचवून श्री.पाटील यांनी निरुपण शिक्षण संस्थेस **रू.२०००/-** व श्री.मते यांनी हंगे येथील मंदिर बांधकामासाठी **रू.२०००/-** देणगी दिली.
- श्री.गोविंदराव दामोदर ढोरमले, रा.जातेगाव यांचे सुपुत्र **चि.अमोल** व श्री.अशोक काशिनाथ सोनवणे, रा.हिंगणगाव ता.नगर यांची सुकन्या **सौ.स्मिता** यांचा शुभविवाह दि.२४.०७.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविविहानिमित्त श्री.ढोरमले व श्री.सोनवणे यांनी मंडळास प्रत्येकी **रू.१०००/-** देणगी दिली.

# आपण असे केले तर...


❇ स्व.सौ.गुलाबबाई हेमराज भळगट, रा.कर्जुले हरेश्वर यांच्या दि. १०.०४.२००९ रोजीच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्त नातू प्रशांत रसिकलाल भळगट यांनी **रू.१००१/-** देणगी दिली.

❇ कै.विक्रांत सदाशिव ठुबे, रा.कान्हूर पठार यांच्या दि. ०३.०३.२००९ च्या आठव्या स्मृतीदिनानिमित्त पिताश्री सदाशिव उर्फ अंजाबापू आप्पाजी ठुबे यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.

❇ पै.रहिम कुतुबुद्दिन राजे, पारनेर यांचे स्मरणार्थ सुपुत्र मलीक यांनी **रू.२०००/-** देणगी दिली.



❇ श्री.केशवराव भगवंतराव वाबळे, रा. घाणेगाव, यांनी दिनांक १६.०४.२००९ च्या वाढदिवसानिमित्त **रू.२०००/-** देणगी दिली.




❇ श्री.लक्ष्मण हरिभाऊ थोरात, पिंपरी जलसेन यांनी दिनांक १.५.२००९ च्या वाढदिवसानिमित्त **रू.२१००/-** देणगी दिली.



❇ कै.भिमराज हरिभाऊ दहिवळ, रा.जवळे यांचे स्मरणार्थ सुपुत्र संतोष यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.

❇ श्री.साहेबराव सोनू पवार, रा.सुपे, यांच्या दिनांक १२.०९.२००९ च्या ८० व्या वाढदिवसानिमित्त सुपुत्र भगवंतराव यांनी **रू.१००१/-** देणगी दिली.

❇ स्वर्गीय मनोज उत्तमचंद कर्नावट, रा.खडकवाडी यांच्या दि. १०.०८.२००९ च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त पिताश्री उत्तमचंद रामचंद कर्नावट यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ कै.शंकरराव बाबुराव आवारी, रा.रांधे यांचे स्मरणार्थ सुपुत्र संदीप यांनी **रू.५०००/-** देणगी दिली.


❇ कै.बबईबाई काशिनाथ शेळके, रा.हत्तलखिंडी यांचे स्मरणार्थ सुपुत्र पंढरीनाथ यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.

❇ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२००९ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे प्रा. जगदीश तुकाराम देंडगे, रा. गांजीभोयरे व श्री. नामदेव मारुती साबळे, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास प्रत्येकी **रु. १०००/-** देणगी दिली.



❇ कै.बाळूबाई गोविंद आंबुले, रा.पारनेर यांचे स्मरणार्थ सुपुत्र गणपतराव आंबुले सर यांनी **रू.५०००/-** देणगी दिली.

❇ कै.गणपत मनाजी गायखे, रा.कान्हूर पठार यांचे स्मरणार्थ सुपुत्र धोंडीबा यांनी **रू.५०००/-** देणगी दिली.




*मुळचंद शिंगवी*

❇ स्व.सौ.वासंतीबाई मुळचंद शिंगवी, रा.पारनेर यांचे स्मरणार्थ पती मुळचंद हंसराज शिंगवी यांनी **रू.११०००/-** देणगी दिली.




❇ स्व.धीरजकुमार प्रदीपकुमार कर्नावट यांचे दि.०३.०४.२००९ चे स्मृती दिनानिमित्त आजोबा पोपटलाल रामचंद कर्नावट, रा.खडकवाडी यांनी **रु.३०००/-** देणगी दिली.

❇ **पदमाबाई दिगबंर वैद्य**, रा. मांडवे यांचे दिनांक २८.७.२००९ च्या स्मृती दिनानिमित्त सुपूत्र श्री. संजय यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❇ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२००९ च्या वाढदिवसानिमीत्त पिताश्री श्री. तुकाराम विठ्ठल नरसाळे, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❇ **श्रीमती दगडाबाई नारायण जगदाळे**, रा. बाभुळवाडे यांचे स्मरणार्थ सुपुत्र बाळासाहेब यांनी मंडळास **रु.३००१/-** देणगी दिली.



❇ **कै.सौ.मालतीबाई दत्तात्रय ठुबे**, रा. कान्हूर पठार यांचे स्मरणार्थ त्यांचे पती श्री.दत्तात्रय आप्पाजी ठुबे यांनी मंडळास **रु. ५०००/-** देणगी दिली.



*हेमंत नरसाळे*

❇ **कै.मार्तंड यमनाजी नरसाळे**, रा. **गोरेगाव** यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपूत्र श्री.हेमंत यांनी मंडळास **रु.५०००/-** देणगी दिली.

❇ कै.सौ.ताराबाई रामचंद्र खराडे, रा.निघोज यांचे स्मरणार्थ सुपुत्र सुरेश यांनी **रू.२१००/-** देणगी दिली.

# अभिनंदन




❇ **ॲड. विकास सुरेश पोटघन** रा.जातेगाव यांनी अत्यंत जिद्दीने परिस्थितीवर मात करून ऑक्सफर्ड विद्यापीठाची कायद्याची अत्युच्च **सॉलीसीटर** ही पदवी प्राप्त केली.



❇ **सौ. विजया सहदेव आहेर,** रा.पळसपूर या न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथे प्राध्यापिका असून त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक तर्फे 'Water Quality Assesment of Parner Tahasil' या विषयावर **M.Phil.** पदवी प्राप्त केली.





❇ **श्री.अशोक दिगंबर घोरपडे**, रा. चिंचोली यांची पुणे महानगर पालिकेच्या उद्यान विभागात **'उद्यान अधिक्षक'** पदी पदोन्नती झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.दशरथ रामभाऊ वीर**, रा. अस्तगाव यांची काळेवाडी, पिंपरी, पुणे येथील **ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी** निवड झाली.

❇ **कुमार सौरभ रमेश सालके**, रा.जवळे यास इंडीयन रेडक्रॉस सोसायटी तर्फे पोस्टर कॉम्पीटीशन मध्ये महाराष्ट्र राज्यात **प्रथम** क्रमांकाचे बक्षीस मिळाले. तसेच त्यास कॉमन वेल्थ युथ गेम्स तर्फे घेतलेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये सुद्धा **प्रथम** क्रमांकाचे बक्षीस मिळाले. तो नगरवाला स्कूलमध्ये इ.१०वी मध्ये शिकत आहे.





❇ **श्री.सुनील भगवंत शेटे,** रा. पारनेर यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती झाली असून त्यांची पुणे येथे नेमणूक झाली आहे. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रु.२०००/-** देणगी दिली.

❇ **श्री.सचीन अशोक ढुबे**, रा.कान्हूर पठार यांची आयुर्विमा महामंडळ, पुणे येथे विकास अधिकारी पदावर निवड झाली.




❇ **श्री.शंकर केशव झावरे,** रा.भोंद्रे यांची रयत शिक्षण संस्थेच्या 'सद्‌गुरू अनंत महाराज विद्यालय' नाते, ता. महाड, जि. रायगड येथे मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **सौ.तारा जनार्दन ढुबे**, रा.कान्हूर पठार या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये माध्यमिक शिक्षण विभागामध्ये कार्यरत असून त्यांची मुख्याध्यापिका म्हणून पदोन्नती झाली आहे. गेली सलग पाच वर्षे त्यांना 'अत्युत्कृष्ट' कामगिरीबद्दल महापालिकेतर्फे प्रमाणपत्र मिळत आहे.




❇ **सौ.माधवी गणेश ढुमणे,** रा. अळकुटी या घर व नोकरी सांभाळून एम.बी.ए. फायनान्स मध्ये उत्तीर्ण झाल्या. तसेच त्या J.A.I.I.B. ही परिक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्या कॉसमॉस बँकेमध्ये नोकरीस असून त्यांची असिस्टंट मॅनेजर म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.किरण सदाशिव चाहेर,** रा. वाळवणे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर निवड झाली आहे.



❇ उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते **श्री.मुरलीधर तुकाराम साठे,** रा.यवती पाडळी यांची लायन्स क्लब ऑफ भोजापूर गोल्ड चे अध्यक्षपदी निवड झाली.



❇ **श्री.सदाशिव गणपत थोरात** रा.करंदी यांची दिलासा इन्स्टिट्युट ऑफ लर्नींग अँड सोशल सर्व्हिस ॲक्टिव्हीटीज, पुणे या संस्थेवर विश्वस्त म्हणून नेमणूक झाली.

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# वसतिगृहाच्या एका खोलीचे रु.६१०००/- चे देणगीदार (१.४.०९ नंतरचे)


कै.भास्करराव औटी

❊ स्वातंत्र्य सैनिक व पारनेर तालुक्याचे १९५२ ते १९६२ पर्यंत आमदार असलेले **कै.भास्करराव तुकाराम औटी** यांचे स्मरणार्थ सुपुत्र आमदार विजयराव औटी यांनी **रू.१,००,०००/-** देणगी दिली.


आ.विजयराव औटी



कै.भिकाजी झावरे


❊ श्री. शिवाजीराव भिकाजी झावरे, सी.ए., संचालक झावरे प्रोफेशनल ॲकेडमी, पुणे यांनी त्यांच्या दि.१०.०९.२००९ च्या वाढदिवसानिमित्त जुन्या पिढीतील आदर्श शिक्षक पिताश्री **कै.भिकाजी बाळाजी झावरे,** रा.गारगुंडी यांचे स्मरणार्थ **रू.६१,०००/-** देणगी दिली.


शिवाजीराव झावरे



कै.चमकबाई बोकरीया

❊ **कै.चमकबाई शांतीलालजी बोकरिया,** रा.कान्हूर पठार यांचे दि. ०५.०९.२००९ च्या प्रथम महिना स्मृतीदिनाप्रित्यर्थ सुपुत्र श्री.सुनील यांनी **रु.६१०००/-** देणगी दिली. त्यांनी मागील वर्षी पिताश्री **शांतीलालजी** यांचे स्मरणार्थ सुद्धा **रु.६१०००/-** देणगी दिली होती.


सुनील बोकरिया


कै.आनंदराव शिंदे

❊ **कै.सौ.जमुनाबाई आनंदराव शिंदे व कै.आनंदराव दशरथ शिंदे,** रा.डिकसळ, यांचे स्मरणार्थ सुपुत्र श्री.रामचंद्र, व्हाईस प्रेसिडेंट, किर्लोस्कर न्यूमॅटिक (निवृत्त) यांनी **रू.६१११११/-** देणगी दिली.



रामचंद्र शिंदे


संजय कदम

❊ **श्री.संजय बाबुराव कदम** रा.पिंपरी जलसेन यांनी **रु.६५,५००/-** देणगी दिली.

❊ **श्री.सुनील गंगाधर रोहकले,** भाळवणी यांनी **रु.६६,०००/-** देणगी दिली.


सुनील रोहोकले

**मळगंगा बिल्डिंग अँड प्लंबिंग कॉन्ट्रॅक्टर**

***पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका लायसेन्स कॉन्ट्रॅक्टर***

**आर.सी.सी. व बिल्डींग कन्स्ट्रक्शनची सर्व कामे केली जातील.**

**नगरपालिकेची ऑफिशीयल कामे व एन.ओ.सी.ची सर्व कामे केली जातील.**

**वॉटर प्रुफींग, लिकेजची सर्व कामे खात्रीशीर केली जातील.**


**श्री.सदाशिव गणपत थोरात (करंदी)**

**श्री.दत्तकृपा निवास, सिंहगड कॉलनी, जवळकर नगर, पिंपळे गुरव, पुणे ४११०२७.**


**फोन :- ९८५०७४०१९९, ९२२५५१४२६९**

# विद्यार्थी अभिनंदन

**इयत्ता १०वी**



❇ **कु.स्नेहल दत्तात्रय बांडे** रा.टाकळी ढोकेश्वर हीस ९५% गुण मिळाले.



❇ **कु.ऋतुजा बाळासाहेब बांडे,** रा.टाकळी ढोकेश्वर हीस ९४.७% गुण मिळाले.



❇ **कु.ऋतुजा केरू गवळी**, रा.बाबुर्डी हीस ९२% गुण मिळाले.



❇ **कुमार राहुल प्रकाश रोहोकले**, रा.भाळवणी यास ९२% गुण मिळाले.




❇ **कु.स्मिता प्रभुशंकर होन,** रा.अळकुटी हीस ९०% गुण मिळाले.



❇ **कुमार आदित्य भास्कर वराळ,** रा.निघोज यास ९०% गुण मिळाले.



❇ **कु.वीणा संजीव धुमाळ,** रा.लोणी मावळा हीस ८९% गुण मिळाले.




❇ **कुमार आकाश नारायण जगदाळे,** रा.बाभुळवाडे यांस ८८% गुण मिळाले.




❇ **कु.पल्लवी किसन ठुबे**, रा.कान्हूर पठार हीस ८७% गुण मिळाले.




❇ **कु.ऐश्वर्या सुनील औटी,** रा.पारनेर हीस ८७% गुण मिळाले.



❇ **कुमार किरण निळकंठ मापारी,** रा.राळेगण सिद्धी यास ८७% गुण मिळाले.



❇ **कुमार सागर रोहीदास गागरे,** रा.वनकुटे यास ८६% गुण मिळाले.



❇ **कुमार रिषीकेश सुनील वाघुंडे,** रा.कान्हूर पठार यास ८५% गुण मिळाले.



❇ **कु.पुजा बाळासाहेब शिंदे,** रा.पिंपरी पठार हीस ७५% गुण मिळाले.




❇ **कु.शुभांगी बाळासाहेब रेपाळे,** रा.पुणेवाडी हीस ७३% गुण मिळाले.




❇ **कुमार विश्वजीत दिलीप बागुल**, रा.मांडवे खुर्द यास ६८% गुण मिळाले.

**इयत्ता ११वी**




❇ **कुमार आशीष संतोष शिंगवी**, रा.पारनेर यांस शास्त्र शाखा अकरावी मध्ये ८०% गुण प्राप्त झाले.


**इयत्ता १२वी**




❇ **कुमार ऋषीकेश केरू गवळी,** रा.बाबुर्डी यास ८५% गुण मिळाले.



❇ **कुमार** रोहीत रघुनाथ व्यवहारे, रा.कान्हूर पठार यास ८५% गुण मिळाले.





❇ **कु.प्रतिक्षा पंजाबराव शेळके**, रा.नारायणगव्हाण हीस ८५% गुण मिळाले.



❇ **कुमार जयदीप प्रकाश ठुबे,** रा.कान्हूर पठार यास इ.१२वी मध्ये ७५% गुण मिळाले.

❇ **कुमार राहुल बाळासाहेब आहेर,** रा.पळसपूर यास एम.फार्म मध्ये ७०% गुण मिळाले.






❇ **कुमार अनिल बाळासाहेब आहेर,** रा.पळसपूर यास बी.ई.इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली. मध्ये ६३% गुण मिळाले.

❇ **कुमार संतोष किसन पागीरे,** रा.पिंपरी पठार यास बी.एस.सी. केमीस्ट्रीमध्ये ९०.३३% गुण मिळाले.

❇ **कुमार सुशांत सुधाकर जेऊरकर**, रा.पारनेर यास डिप्लोमा इन मॅकॅनिकल इंजिनियरींगच्या दुसऱ्या सत्रामध्ये ६६% गुण मिळाले.



**'संवाद' पत्रिकेबाबत**
**आपल्या प्रतिक्रिया जरुर कळवाव्यात.**

# दुःखद निधन

❇ **श्रीकांत अनंत पोळ,** रा.पारनेर यांचे दि.३१.०३.२००९ दुःखद निधन रोजी झाले.


❇ श्री.दामोदर भारत मकाशीर, रा.पिंपळनेर यांच्या मातोश्री **श्रीमती सुभद्राबाई भारतबुवा मकाशीर** (वय ७५), यांचे दि.०४.०४.२००९ रोजी दुःखद निधन झाले.



❇ ह.भ.प.नारायण महाराज जाधव, रा.कर्जुले हरेश्वर यांच्या मातोश्री **श्रीमती राधाबाई महादू जाधव** (वय ७८), या चैत्र शुद्ध एकादशी दि. ०५.०४.२००९ रोजी वैकुंठवासी झाल्या. त्यांचे स्मरणार्थ त्यांचे पुतणे श्री.पोपट आनंदराव जाधव यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.विष्णूपंत अनंतराव पोळ** (वय ७७), रा.पारनेर यांचे दि.०३.०५.२००९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांनी भारतीय वायुसेनेमध्ये १६ वर्षे नोकरी केली होती. मंडळाच्या तसेच इतर सामाजिक कामात त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.मनोज यांनी मंडळास **रू.२५०१/-** देणगी दिली.



❇ **श्रीमती सखुबाई श्रीपती तरटे** (वय ९५), रा.पळवे यांचे दि.०३.०६.२००९ रोजी दुःखद निधन झाले.

❇ **श्री.मारुती गोविंद राव,** रा.अळकुटी यांचे दि.१४.०६.२००९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांनी देहदान केले.


❇ **श्रीमती रंभाबाई उर्फ कंवरबाई त्रिलोकचंद मुथीयान**, (वय ८८) रा.कान्हूरपठार यांचे दि. ०४.०६.२००९ रोजी दुःखद निधन झाले.



❇ **श्री.शंकरराव भाऊसाहेब कोठावळे,** रा.सांगवी सूर्या यांचे दि.०६.०७.२००९ रोजी दुःखद निधन झाले.

❇ **सौ.अलका (निलम) बाबाजी तोडकर** रा.वडझिरे यांचे दि.१८.०७.२००९ रोजी दुःखद अपघाती निधन झाले. त्यांचे स्मरणार्थ त्यांचे बंधु श्री.अशोक विश्वनाथ वाबळे रा.निघोज यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.


❇ राळेगण सिद्धी मधील प्रगतीशील शेतकरी **श्री.संपतराव सावळेराम पठारे** (वय ४८) यांचे दि.२७.०७.२००९ रोजी दुःखद निधन झाले.



❇ **श्रीमती चमकबाई शांतीलालजी बोकरिया,** रा.कान्हूर पठार यांचे दि.०५.०८.२००९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे दि.०५.०९.२००९ च्या प्रथम महिना स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.सुनील यांनी मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.




❇ **श्री.देवराम सखाराम नरड,** (वय ७८), रा.कासारे यांचे दि.१०.०८.२००९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे स्मरणार्थ त्यांचे पुतणे श्री.भाऊसाहेब गंगाराम नरड यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.




**'संवाद' साठी आपले लेख स्वागतार्ह आहेत.**

# भावपूर्ण निरोप


❊ **श्री.बाळासाहेब धोंडीबा मापारी,** रा.राळेगण सिद्धी हे बँक ऑफ इंडिया मधून ४१ वर्षांच्या सेवेनंतर दि.०१.०३.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले.




❊ **श्री.रामचंद्र ठकाजी भुजबळ,** रा.भांडगाव हे सँडविक एशिया कंपनीमधून ३७ वर्षांच्या सेवेनंतर दि.०९.०४.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले. ते श्रीमंत जगत्गुरु साईबाबा प्रतिष्ठान संभाजीनगर, चिंचवड या सेवाभावी संस्थेचे विश्वस्त असून पिंपरी चिंचवड सहकारी बँकेचे संचालक तसे वृंदावन नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.यशवंत वसंत देखणे,** रा.गोरेगाव हे टाटा मोटर्सच्या आर्थिक विभागातून ३५ वर्षाच्या सेवेनंतर डिव्हीजनल मॅनेजर फायनान्स या पदावरून दि.०९.०४.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.परशुराम सखाराम सोंडकर,** रा.हंगे हे अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक पदावरून दि.३०.०४.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले.



❊ **श्री.सावळेराम तुकाराम ढुबे,** रा.कान्हूर पठार हे रयत शिक्षण संस्थेमधून प्राचार्य म्हणून दि.३१.०५.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या उत्कृष्ठ शैक्षणिक कामगिरीबद्दल त्यांना सप्टेंबर २००८ मध्ये आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे.




❊ **श्री.त्रिंबकराव पाटीलबा पठारे,** रा.वाळवणे हे महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी मधून दि.३१.०५.२००९ रोजी सहाय्यक दक्षता अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांनी एकंदर ३२ वर्षे नोकरी केली.




❊ **प्रा.बाळकृष्ण भिमाजी नवले,** रा.नवलेवाडी हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या ज्युनियर कॉलेजमधून दि.३१.०५.२००९ रोजी ३६ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.


❊ **श्री.भास्करराव भिकाजी शेळके,** रा.भोंद्रे हे महाराष्ट्र शासनाच्या सेवेमधून दि.३०.०६.२००९ रोजी अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांनी एकंदर ३७।। वर्षे नोकरी केली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०,०००/-** देणगी दिली.



❊ **ले.कर्नल विश्वनाथ तुळशीराम कळमकर,** रा. कळमकरवाडी हे संरक्षण विभागाच्या कोअर ऑफ सिग्नल मधून दि.३०.०६.२००९ रोजी ३९ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. दि. १५.०६.१९७० मध्ये ते शिपाई म्हणून भरती झाले. दि. ०१.१०.१९८८ रोजी त्यांना कमिशन मिळाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.सदाशिव गुलाबराव चाहेर,** रा.वाळवणे हे ४० वर्षांच्या सेवेनंतर पोलीस विभागातून फौजदार पदावरून दि.३१.०७.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले.




❊ **श्री.धोंडीबा गणपत गायखे,** रा.कान्हूर पठार हे बँक ऑफ इंडीया मधून दिनांक ३१.०८.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले. ते मॅनेजर (क्रेडीट) या पदावर होते.



❊ **श्री.वसंतराव महादेव चव्हाण,** रा.पारनेर हे भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य या विभागातून दि.३१.०५.२००८ रोजी वित्त अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५१०१/-** देणगी दिली.



**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाच्या विद्यार्थी वसतीगृहाचे बांधकाम सुरु झालेले असून सोबतच्या नकाशामध्ये बांधकामाच्या जागेचे ठिकाण दाखविले आहे. मंडळास बांधकाम वेगाने पूर्ण करण्याकरीता आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. सभासदांनी आपल्या मित्र परिवारासहीत जागेस अवश्य भेट देऊन बांधकामाची प्रगती पाहून देणगी द्यावी ही विनंती.**

☺ *बांधकामाच्या जागेचा पोस्टल पत्ता -*
**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह इमारत**
**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ३३.**
**द्वारा - अशोक वाबळे, मो.नं. ९८८१६०८३५७**

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ए-१/१ यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०